# 'त्या' विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा

## विद्यापीठ संकेतस्थळावर वेळापत्रक : २१ ऑक्टोबरपासून परीक्षेला प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यंदाच्या अंतिम वर्ष शेवट सत्रातील परीक्षा २१ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. सर्व अभ्यासक्रमांची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. काही तांत्रिक कारणास्तव परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या काळात विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.

परीक्षा विभागाकडून अंतिम वर्ष शेवटचे सत्र परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन युद्ध पातळीवर सुरू आहे. २१ ऑक्टोबरपासून नियोजित सर्व अभ्यासक्रमांच्या विषयांच्या परीक्षा जाहीर केलेल्या तारखेस होणार आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७४ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सीईटी व इतर शासकीय स्पर्धा परीक्षेचे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी आल्यास, विद्यार्थ्यास कोरोना विषाणूची बाधा झाल्यास, एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा असल्यास आदी कारणास्तव जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी नजीकच्या काळात विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.

याबाबतची माहिती वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. विशेष परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यासाठी सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रती महाविद्यालये, अधिविभागाच्या प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख यांच्यामार्फत संबंधित परीक्षा विभागात सादर करणे आवश्यक आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

### सहाय्य कक्ष स्थापन

विद्यापीठाच्या ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षेत येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन देण्यात आली आहे. उन्हाळी सत्रातील अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षार्थींना तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास helpline@unishivaji.ac.in या ई-मेलवर कळविण्यात यावे. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शंका, तक्रारींचे निराकरण केले जाईल. याबाबतचे परिपत्रक परीक्षा विभागातर्फे काढण्यात आले आहे.

# २७ हजार विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट

## ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप, संगणक प्रणाली समजण्यासाठी सुविधा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने २१ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षार्थींना ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप व संगणक प्रणाली समजावी, यासाठी मॉक टेस्टची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मागील दोन दिवसांत ५० हजार ५२७ विद्यार्थ्यांपैकी २७ हजार ३९३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन मॉक टेस्ट सोडविली आहे.

विद्यापीठाच्या वतीने मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. ही टेस्ट विषयनिहाय नसून सामान्यज्ञानावर आधारित आहे. इंग्रजी व मराठी माध्यमांचा प्रणालीत समावेश आहे. चार दिवसांपासून नैसर्गिक आपत्तीमुळे



**शिवाजी विद्यापीठातून...**

बऱ्याच ठिकाणी मोबाईलचे नेटवर्क, विद्युत पुरवठा खंडित झाला असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना मॉक टेस्टची लिंक, लॉगीन आय.डी. प्राप्त होण्यास अडचणी येत आहेत. जे विद्यार्थी अद्याप परीक्षा देऊ शकलेले नाहीत, त्यांच्यासाठी विद्यापीठामार्फत पुन्हा एकदा लिंक पुरविण्यात येणार आहे. त्रुटी, तांत्रिक अडचणींच्या निराकरणासाठी कॉल सेंटरमार्फत ३० हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यांची माहिती स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या वेबसाईटवर देण्यात आली आहे. महाविद्यालयीन, अधिविभाग स्तरावरून विद्यार्थ्यांना सहाय्य व समुपदेशनाकरिता शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबतचे आदेश महाविद्यालय व अधिविभागांना दिले आहेत.

ऑनलाईन परीक्षेसंदर्भात विशेष कॉल सेंटरमार्फत दिवसभरात २७०० विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. १५०० विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यात आल्या. मोबाईल रेंजच्या अडचणी असलेल्या ८०० विद्यार्थ्यांना पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आले, अशी माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

# विद्यार्थ्यांसाठी ३० हेल्पलाईन नंबर

## ऑनलाईन परिक्षेतील अडचणींचे निराकरण : विद्यापीठ संकेतस्थळावर नंबर प्रसिद्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्षातील शेवटच्या सत्राच्या परीक्षा बुधवार (२१ ऑक्टोबर) पासून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आलेल्या मॉक टेस्टदरम्यान अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागले आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने ३० नवीन हेल्पलाईन नंबर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा अशा तीन जिल्ह्यांसाठी वेगवेगळे नंबर संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

ऑनलाईन परीक्षा व मॉक टेस्टदरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी विद्यापीठाच्या कॉल सेंटरमार्फत ३० हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन दिले आहे. या नंबरचा तपशील विद्यापीठाच्या



वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याचबरोबर विद्यापीठाकडून इ मेलवर विद्यार्थ्यांना त्यांच्या तक्रारी सादर करण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. महाविद्यालय स्तरावरुन विद्यार्थ्यांना सहाय्य तसेच समुपदेशन करण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

**२७०० विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन**

ऑनलाईन परीक्षेसंदर्भात विद्यापीठाने निर्माण केलेल्या विशेष कॉल सेंटरमार्फत शनिवारी दिवसभरात सुमारे २७०० विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. पी. आर. एन. क्रमांक संदर्भात सुमारे १५०० तर मोबाईल रेंजच्या अडचणींमुळे ८०० विद्यार्थ्यांना पासवर्ड उपलब्ध होत नव्हते, ते त्यांना उपलब्ध करून देण्यात आले, अशी माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

**पुन्हा एकदा होणार मॉक टेस्ट**

१६ व १७ ऑक्टोबर दरम्यान एकूण ५० हजार ५२७ विद्यार्थ्यांपैकी २७ हजार ३९३ इतक्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन मॉक टेस्ट यशस्वीपणे सोडविली. नैसर्गिक आपत्तीमुळे मोबाइलचे नेटवर्क आणि विद्युत पुरवठा खंडित झाला असल्यामुळे मॉक टेस्टची लिंक, लॉगीन आय.डी. प्राप्त होण्यात अडचणी निर्माण झाल्या. यामुळे जे विद्यार्थी अद्याप सराव परीक्षा देऊ शकलेले नाहीत, त्यांच्यासाठी विद्यापीठामार्फत पुन्हा एकदा लिंक पुरविण्यात येणार आहे.

# डॉ. आर. के. कामत यांची अधिष्ठातापदी नियुक्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. आर. के. कामत यांची नियुक्ती झाली आहे.

डॉ. कामत यांना २५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभागप्रमुख, प्रभारी ग्रंथपाल म्हणून काम केले आहे. सध्या संगणक शास्त्र आधिविभाग प्रमुख, नवोपक्रम नवसंशोधन व उपक्रम मंडळ संचालक, यूजीसी करिअर कौन्सिलिंग सेल संचालक पदावर कार्यरत आहेत.